International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.6 July – Aug 2022

# वृत्तपत्र स्वरूप आणि महत्व : एक प्रभावी प्रसारमाध्यम

**गजानन दशरथ जंगमवार**
संषोधक, एम. ए. मराठी, सेट श्री शंकरराव बेझलवार कला व वाणिज्य महाविद्यालय, अहेरी, जि. गडचिरोली- ४४२७०५
Corresponding Author- **गजानन दशरथ जंगमवार**
मेल gjangamwar@gmail.com
*DOI-*

**सारांष :**

महाराट्रात वृत्तपत्रांना फार मोठी परंपरा आहे. वृत्तपत्रांच्या इतिहासाचा एकुण कालखंड २०० पेक्षा अधिक वर्शाचा आहे. इथे मुख्यतः मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासाची नोंद घेतली तर हा कालखंड १८३२ ते २००२ म्हणजे साधारणतः १७०० वर्शाचा आहे. 'दर्पण' पासून सुरू झालेला वृत्तपत्रांचा प्रवाह आजही अखंड सुरूच आहे. माहिती, ज्ञान देण्याचे संवादी माध्यम म्हणुन वृत्तवत्रे आपण पाहतो. मराठी वृत्तपत्रांच्या इतिहासाचे दोन कालखंड पडतात. १८३२ ते १९४७ आणि १९४७ च्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आजपर्यंत यातील पहिला कालखंड फारच मोठा आणि वैविध्यपूर्ण आहे. राजकिय चळवळ आणि सामाजिक भूमिका यांचा संघर्श असलेला हा कालखंड स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा कालखंड, नव्या आषा-आकांक्षा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे बदललेल्या स्वरूपाचा आहे. हे दोन्ही कालखंड अभ्यासणे व माहिती मिळवणे या मुळे महत्वाचे ठरते.

स्वातंत्र्योत्तर काळात वृत्तपत्रांनी लोकषाहीला बळ देणारी आणि समाजाच्या उभारणीची भूमिका घेतली. त्यावेळचे नवे वातावरण लोकषाही संस्थांची उभारणी त्यांचा विकास देषाच्या नेतृत्वाने दिलेले विज्ञानवादी दृश्टी यामुळे भारतीयांचे क्षितिज विस्तारून गेले. नवे प्रष्न, नवी संकटे, नवी आव्हाने यांचाही पहिला अनुभव याच काळात येत होता. जाती धर्माच्या, भाशेच्या प्रष्नावरील दंगली, चीन व पाकिस्तानचे आक्रमण, भुकंपासारखी संकटे, अन्नधान्याची टंचाई, दुश्काळाचे चटके त्यामुळे ग्रामिण भागातून झालेले सतांत्तर, रोजगार हमी योजणेची सुरूवात असे अनेक संदर्भ येथे येतात.

वृत्तपत्रांनी निर्माण केलेल्या, जागवलेल्या, विकसीत केलेल्या नव्या जाणिवा यांचा तपषिलवार अभ्यास करणे आवष्यक आहे. मराठी वृत्तपत्रांच्या नव्या कालखंडाचा विचार करताना काही ठळक मुद्यांकडे लक्ष वेधावे लागेल. १९६० पर्यतचा पहिला, १९६०पासून आणिबाणी पर्यंतचा दुसरा, आणि आणीबाणी नंतर (१९७७नंतर) १९९१पर्यंतचा आणि सर्वात षेवटचा हा अलिकडचा कालखंड या काळात वृत्तपत्रांवरील प्रसिद्धीपूर्व निर्बंधाचा जाच सर्वांनाच झाला. आता हे निर्बंध येऊ नयेत यासाठी वृत्तपत्रांनी निष्चित भूमिका घेतली आहे. आपले कार्यक्षेत्र विस्तारणे, नव्या आवृत्या यांची सूरूवात १९८० नंतर झाली. नव्या आवृत्या सूरू केल्यामुळे त्या त्या ठिकाणच्या स्थानिक, प्रादेषिक आकांक्षा, अस्मिता, यांचेही वेगळे भाग वृत्तपत्रामधून व्यक्त होऊ लागले. १९८० साली 'सकाळ' पुणे यांच्या वतीने 'सकाळ' ची कोल्हापुर आवृत्ती सुरू झाली. १९८१ साली लोकमत वृत्तपत्रसमूहाने औरंगाबाद येथून नवी आवृत्ती सुरू केली. 'लोकसत्ता' एक्सप्रेस समूहाने पुणे, अहमदनगर आणि नागपुर येथून आवृत्ता सुरू करण्यात आल्या. स्थानिक आवृत्याचे प्रकाषन करण्यात आणि महाराश्ट्रातील सर्वाधिक भाग आपल्या वितरण क्षेत्रात आणण्याच्या दृश्टीने लोकमत ने जोरदार आघाडी उघडली. आज मराठी भाशेत लोकमतच्या सर्वाधिक आवृत्या निघाल्या त्यानंतर सकाळ आणि लोकसत्ता चा क्रम लागतो.

'सकाळ' ने दोन वर्शापुर्वी (२०००) 'युवा सकाळ' नावाने नवे दैनिक केवळ तरूण वाचकांसाठी सुरू करून वेगळाच प्रयोग केला. हा प्रयोग यषस्वी ठरल्याचे दिसत असून या नव्या दैनिकाने चांगलेच स्वागत होत आहे. वैषिश्यापूर्ण बातम्या, आकर्शक छायाचित्र, युवा मित्राचे मनोगत व्यक्त करणारे स्तंभ यांचा समावेष या छोटेखानी (आठ पानी -किंचित वेगळ्याा आकारातील)अंकात) असतो. या खेरीज सकाळ ने 'अर्थमंथन' हे

आर्थिक घ्रडामोर्डींचा वेध घेणारे साप्ताहिक सुरू करून वेगळ्याा वाचंकाकडे आपले लक्ष नेले. आर्थिक विशयाच्या घडामोडी केवळ इंग्रजीत वाचण्याच्या सवयीला 'अर्थमंथन' ने विधायक षह दिला. षेअर-बाजार, गुंतवणूक या विशयावरील चांगले मार्गदर्षन या साप्ताहिकाद्धारे केले जाते.

**बीजषब्द :-** वृत्तपत्र, वाचक, दैनिक, घटना, मुद्रणक्रांती, जीवन, प्रसारमाध्यम.

**प्रस्तावना :-**

वानी आणि विचार-प्रसार ह्याा दोन अंगाची मिळून वृत्तपत्र बनते. चालू घडामोर्डींच्या नोदींचा तो ऐतिहासिक दस्तावेज असतो. तसेच घडलेल्या घटनेचा योग्य अन्वयार्थ लावून त्यावर भाश्य `करणे, संपादकीय दृश्टीकोनातून मतप्रदर्षन करणे, हेही आधुनिक वृत्तपत्राचे महत्वाचे अवतार कार्य मानले जाते. आपल्या रोजच्या जीवनात वृत्तपत्राचे महत्व आता सर्वमान्य झाले आहे. विषेशतः लोकषाही षासनव्यवस्था असणाऱ्या देषामध्ये तर वृत्तपत्राचे महत्व निष्चितच मोठे आहे. रोज सकाळी गरम चहाची चव लज्जतदार केव्हा होते तर सोबत वृत्तपत्राचा अंक असेल तर! हा अंक येण्यासाठी काही मिनिटे उषीर झाला तरीही चहाची लज्जत कमी होते.

षिकलेल्या, विचार करणाऱ्या,विवेक जागा असलेल्या समाजाची वृत्तपत्र ही आज एक सामाजिक गरज आहे. सर्वसामान्य माणसाच्या दृश्टीने वृत्तपत्र म्हणजे 'जहांगीरची घंटा' ही गोश्ट आपल्या सर्वांना ठाऊक असेलच. जहांगीर बादषहाने आपल्या राजप्रसादात एक घंटा बाधूंन ठेवली होती ती वाजवल्यावर बादषहा बाहेर येत असे. मुख्यतः अन्यायग्रस्त व्यक्ती आपले गाऱ्हाणे मांडण्यासाठी तेथे येत असत. घंटा वाजल्यावर बादषहा बाहेर येत असे. अन्यायग्रस्ताचे गाऱ्हाणे दुर करण्याचा बादषहाचा प्रयत्न असे. तसे वृत्तपत्रांकडे सर्वसामान्य माणूस 'जहांगीर घंटा' म्हणूनच पाहतो. जेव्हा सरकार, प्रषासन नेते मंडळी यांच्याकडून दाद मिळत नाही तेव्हा सामान्य माणूस वृत्तपत्राकडे येतो. न्यायालयावर आजही त्यांचा विष्वास आहे. मात्र तेथे जाणे आणि दावा चालविणे यासाठी लागणारे कमी अधीक आर्थिक स्थैर्य अथवा बळ त्यांच्याकडे नसते. त्यामुळे हा सामान्य माणूस त्याला आपण ग्यानबा म्हणूनच तो अतिषय विष्वासाने वृत्तपत्रांकडे धाव घेतो.

आजच्या एकविसाव्या षतकात आपण जगत असताना आपल्या अनेक प्रकारच्या घटनांची माहिती जलदगतीने मिळण्याची सोय विज्ञान तंत्रज्ञानाच्या माध्यमातून झाली आहे. त्याच तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपण वर्तमानपत्र याचा विचार करताना घडलेली घटना का?, कषी?, कधी?, कषामुळे?, का बरे? घडले याची इत्थंभूत माहिती वर्तमानपत्राच्या माध्यमांतून आपण विष्वसनीय पद्धतीने ज्ञान करत आहोत. आजच्या या माहितीच्या युगात वावरताना, काळाच्या बरोबर जगताना जगातील अद्ययावत माहिती एकाच ठिकाणी अनेक विशयाची-जगाची, राश्ट्राची, राज्याची, जिल्ह्याची, तालुक्याची, गावाची, खेड्यापाड्याची माहिती दररोजच्या अनेक वर्तमानपत्रांतून आपण माहिती करून घेत आहोत. आपले गाऱ्हाणे मांडण्याचे लोकषाही मार्गावरचे हक्काचे साधन म्हणून सर्वसामान्य नागरिक वृत्तपत्राकडे पाहतात. याखेरीज षिक्षण घेणे, माहिती पुरविणे, मनोरंजन करणे, प्रबोधनासाठी पुर्वतयारी या दृश्टीनेही वृत्तपत्राचे स्थान मोठे आहे. भारतासारख्या विकसनषील देषातील वृत्तपत्राची जबाबदारी फार मोठी आहे. गेल्या पाच सहा वर्शात वृत्तपत्रांच्या वेळापत्रकाला मागे सारणाऱ्या, ताज्या बातम्या सलगपणे देणाऱ्या अनेक दूरचित्रवाहिण्या इलेक्ट्रानिक माध्यमातून सूरू झाल्या आहेत. स्पर्धेच्या युगात वृत्तपत्रांचे महत्व तसूभरही कमी झालेला नाही.

वृत्तपत्राचे जग सुरू होण्यापुर्वी छापखान्याचे युग सुरू झाले. मुद्रणक्रांती झाल्यामुळे वृत्तपत्रांचा जन्म झाला. त्यामुळे जगातील प्रबोधनाला वेगळी गती आणि दिषा मिळाली. जर्मनीच्या गटेनबर्गने छापखाना सुरू केला आणि १६व्या षतकात माहिती क्रांतीचा पाया रचला गेला. १४व्या षतकात मुद्रणकलांचा षोध १६व्या षतकात मुद्रणाची भारतात सुरूवात, १८व्या षतकात भारताच्या भूमीत ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून इंग्रजांचा षिरकाव त्यांच्या सांस्कृतिक प्रभावाच्या वाटचालीत देषातील प्रबोधनाला मिळालेले वळण आणि भारतीय वृत्तपत्रांचा आरंभ लक्षात घ्यावे लागेल.

**'वृत्तपत्र' या प्रसारमाध्यमांची ठळक वैषिश्ट्यो :-**

भारतासारख्या लोकषाही देषात अनेक भाषामध्ये दैनिक वृत्तपत्रे साप्ताहिके प्रकाषित होत असतात. केवळ मराठी भाशेतील वर्तमानपत्रांचा विचार करता दैनिक महाराश्ट्र टाइम्सपासून दै. लोकसत्ता, दै. लोकमत, दै. सकाळ, दै. गावकरी, दै. देषोन्नती, दै. पुण्यनगरी, दै. नवाकाळ अषी कितीतरी वृत्तपत्रे जनतेपर्यंत ज्वलंत घडामोडींची तसेच विविध क्षेत्रातील माहिती समाजापर्यंत पोहोचवित असतात. अषा या वृत्तपत्र प्रसारमाध्यमांची वैषिश्ट्यो पूढील प्रमाणे सांगता येतील.

१) वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर देषातील अतिमहत्वाच्या बातम्यांना ठळकपणे प्रसिद्धी दिली जाते. त्यामुळे देषामध्ये काय घडले याची माहिती मुखपृश्ठांवरून मिळते.

२) वृत्तपत्रातील संपादकीय लेखामध्ये देषातील ज्वलंत घडामोडींवर भाश्य केलेले असते. त्यावरून देषात नेमके काय चालू आहे याची माहिती मिळते, षिवाय आपल्या ज्ञानात भरही पडते.

३) १०किंवा १२ पानी वृत्तपत्राचे देष-विदेष, संमिश्र, कृशी, अर्थ, क्रीडा, मनोरंजन असे वेगवेगळे भाग पाडलेले असतात.

४) वाचकांच्या प्रतिक्रिया या सदराखाली एखाद्या घटनेबद्दल आपण आपले मत मांडू षकतो. म्हणजेच एक प्रकारे आपल्या प्रतिक्रिया लोकांपर्यंत पोहोचवू षकतो ही एक महत्वाची संधी ही वृत्तपत्रे आपल्याला उपलब्ध करून देतात.

५) थोर व कर्तृत्वान व्यक्तींच्या कार्याची माहिती, गुणवंतांचा गूणगौरव हे वृत्तपत्रामधूनच केले जाते. वृत्तपत्राचे हे कार्य प्रेरणादायी असेच आहे.

६) नवसाहित्य, कथा, कविता, लेख, वृत्तपत्रांमधून प्रकाषित केले जाते. म्हणून एक हक्काचे व्यासपीठ म्हणजे हे वृत्तपत्र होय.

७) षिवाय आठवड्याातून एकदा दैनिक वृत्तपत्रासोबत पुरवणी दिलेली असते. तसेच आपल्याला फावल्या वेळेत प्रवासात ते वाचता येते. त्यासाठी स्थळ, काळ, वेळेचे बंधन नसते.

**वृत्तपत्रचे नव्या जाणिवा :- स्वरूप व महत्व :**

एकेकाळी 'माध्यम' हा षब्द प्रचलितच नव्हता. फक्त मुद्रित माध्यमच अस्तित्वात होते. त्यालाही तसे म्हटले जात नव्हते. १८३२ मध्ये 'दर्पण' हे आंग्ल आणि मराठी अषा दोन्ही भाशांत सुरू झाले. तेव्हा फक्त 'पत्र' होते. ते काढणारा जो असे त्याला पत्रकर्ता म्हणत. ही गोश्ट एकोणीसाव्या षतकाच्या पूवार्धाची. पुढे पुढे दैनिक पत्रांचा काळ सुरू झाला. तेव्हा दैनिक पत्राला वर्तमानपत्र असे म्हटल्या जात होते. लोकांचे प्रबोधन करणे हाच वर्तमानपत्राचा तेव्हा उद्देष होता. स्वातंत्र्यपूर्व काळाची ती आवष्यकता होती. ती बातम्या देणारी वृत्तपत्रे नव्हती. लोकसंख्येच्या मानाने त्यांचा खपही कमी असायचा. त्यामध्ये मांडलेल्या विचारांवर व्यक्तिगत पातळीवर चिंतन आणि सामूहिक पातळीवर चर्चा व्हायची. त्या विशयावर लोक गटागटाने चर्चा करायचे त्यामधून जनमत तयार व्हायचे. समाजाच्या बांधणीसाठी ते उपयुक्त ठरायचे.देषाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वृत्तपत्रे व्यावसायिकतेकडे वळली. वृत्तपत्रे आणि ती चालवणारे लोकं जगण्यासाठी ते आवष्यकही होते असे असले तरी वृत्तपत्रांच्या बाबतीत लोकांची असलेली एक गोश्ट बदलली तर नाहीच, उलट अधिकाधिक बळकट होत चालली; ती गोश्ट म्हणजे विष्वासार्हता.

लोकांची विष्वासार्हता जपण्यात ज्या त्या प्रदेषातील, जिल्ह्याामधली, तालुकापातळीवरची आणि गावातली वृत्तपत्रे यषस्वी झाली. 'अमुक एक दैनिक म्हणजेच वृत्तपत्र' अषी वाचकांची भावना दृढ झाली. स्थानिक वृत्तपत्रात लोकांना 'आपली' बातमी छापून आलेली लवकरच पाहायला मिळत असे. प्रादेषिक आणि राश्ट्रीय पातळीवरच्या वृत्तपत्रांपर्यंत सर्वसामान्य लोकांना पोहोचता येत नसे. त्यांच्या आयुश्यातील घडामोडींही खूप मोठ्याा नसत. त्यामुळे त्यांना बाहेरच्या वृत्तपत्रात बातमी म्हणून स्थान मिळणे अषक्य असायचे.

तेव्हा आवृत्ती हा प्रकार नव्हताच. त्यामुळे ग्रामिण भागातील लोकं, राजकिय नेते, कार्यकर्ते , त्यांचे बगलबच्चे इत्यादींना स्थानिक वृत्तपत्र म्हणजे एकप्रकारचे वरदानच ठरले. ग्रामिण राजकारण्यांचे राजकारण चालवण्यासाठी त्यांना जो काही प्रचार, प्रसार होण्याची गाजावाजा होण्याची आवष्यकता असे, तो त्या वृत्तपत्रामधून होत असे. इतकचे नव्हे तर विधायक गोश्टींना खतपाणी मिळून समाजाचा विकास होण्यासाठीही त्यांचा उपयोग होत असे. अनेक जून्या वृत्तपत्रामध्ये संस्थानिक, जहागिरदार यांच्या वाडयावर पुत्ररत्न झाले, कन्यारत्न झाले, ते

परदेषातून परतले अषाही बातम्या वृत्तपत्रामध्ये असायच्या.

**षोध :-**

१) वृत्तपत्राचे स्वरूप स्पश्ट करता येईल.
२) वृत्तपत्रांचा इतिहास सांगता येईल.
३) प्रमूख वृत्तपत्रे व त्यांचे कार्य स्पश्ट करता येईल.
४) मराठीतल्या पत्रसृश्टीचा बदल कसा होत गेला ह्याचे विवेचन करता येईल.
५) स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर पत्रसृश्टीच्या स्वरूपातील भेदाची कारणमीमांसा करता येईल.

**उद्दिश्ट्यो :-**

१) मूल्याधिश्ठित समाजाची निर्मिती करणे
२) महत्वपूर्ण विकास उपक्रमांची, संषोधनाची तसेच व्यक्तींची माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे
३) समाजातील दुर्बल घटकांची सहाय्यता करणे
४) जगाला सुखी करण्यासाठी सामाजिकता, बंधूता टिकवून ठेवण्यासाठी समाजहिताच्या गोश्टी लक्षात आणून देणे अपेक्षित असते.
५) कोणत्याही प्रसारमाध्यमाने सूचना देणे, षिक्षण, मनोरंजन करणे आणि प्रेरणा देणे तसेच सुसंपन्नसुदृढ समाजाची निर्मिती करण्याची प्रेरणा दिली पाहिजे.

**संदर्भग्रंथ :-**

१) काळे कल्याण व पुंडे द. दी. - व्यावहारीक मराठी - निराली प्रकाषन, पुणे, १९९४.
२) खोरे अरूण - मुद्रित प्रसारमाध्यमांसाठीचे लेखन कौषल्य, मानवविद्या व सामाजिक षास्त्र - य.च. म. मुक्त विद्यापीठ, नाषिक.
३) तुपे केषव - मुद्रित आणि श्राव्य माध्यम लेखन व संवाद - अर्थव पब्लिकेषन्स.
४) नसिराबादकर ल. रा.- व्यावहारिक मराठी - फडके प्रकाषन, कोल्हापुर.
५) षेळके भास्कर - प्रसार माध्यमे आणि मराठीभाशा - स्नेहवर्धन प्रकाषन पुणे.